NAAC Accredited-2015
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगांव, सोलापूर ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१/७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स: ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://sus.ac.in ई-मेल: fao.@sus.ac.in



## खरेदी व भांडार विभाग

जा.क्र. पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२५/64 दिनांक: 24 APR 2025

## परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठात विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुले यांचेकडून विविध कार्यक्रमांचे तसेच पीएम-उषा प्रकल्पाच्या Soft Component अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठामध्ये चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदा इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. सदर उपक्रमासाठी उपस्थितांसाठी व मान्यवरांसाठी चहा, नाश्ता व भोजन इ.ची व्यवस्था प्रसंगानुरुप करावी लागते. यासाठी विहित प्रक्रिया वारंवार करावी लागत होती. याचा विचार करुन अशा कामासाठी पुरवठाधारक निश्चित करण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार यासाठी विहित निविदा प्रक्रिया करुन न्युनतम दर असलेली मे. प्रगती केटरर्स, सोलापूर व मे. प्रविण एंटरप्रायझेस, सोलापूर या दोन फर्मला पुरवठाधारक म्हणून निश्चित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सदर दोन्ही फर्मसोबत दोन वर्षाकरिता दरकरार करण्यास व सदर पुरवठाधारकांकडून पुरवठा करुन घेण्यास दि.२७/०३/२०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.७ (१) अन्वये व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार मे. प्रगती केटरर्स, सोलापूर व मे. प्रविण एंटरप्रायझेस, सोलापूर या दोन्ही फर्मसोबत दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२७ या दोन वर्षाकरिता दरकरार करण्यात आलेला आहे. सोबत चहा, नाश्ता व भोजन इ.ची व्यवस्था करण्यासाठी दराचे परिशिष्ठ "अ" जोडले आहे.

सबब, सर्व संकुलाचे संचालक व प्रशासकीय विभागप्रमुख यांना या परिपत्रकाव्दारे आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या विभाग/संकुला अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रम, कार्यशाळा व कार्यालयीन बैठकावेळी उपस्थितांसाठी व मान्यवरांसाठी चहा, नाश्ता व भोजन इ.ची प्रसंगानुरुप व्यवस्था करण्यासाठी संबंधित फर्मला आदेश देऊन त्यांच्याकडून पुरवठा करुन घ्यावयाचा आहे. याकरिता सोबत जोडलेल्या करारातील अटी व शर्तीचे पालन करुन सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन आपल्या स्तरावर पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच संबंधित फर्मने काम पूर्ण केल्यानंतर प्राप्त देयकास संकुल/विभाग प्रमुखांची मान्यता घेवून तीन दिवसांत सदर देयक आदायगीसाठी वित्त व लेखा विभागाकडे सादर करण्यात यावे. जेणे करुन संबंधित फर्मला देयकाची रक्कम वेळेत आदा करणे सोईचे होईल व विद्यापीठाचे कार्यक्रम व्यवस्थित पार पडतील.

24.4.25

(सीए. एम.एस. खराडे)
वित्त व लेखा अधिकारी

**सोबत: - करारनामा व परिशिष्ठ 'अ'**

**प्रति,**

१. सर्व प्रशासकीय विभाग
२. सर्व शैक्षणिक संकुले
३. मा. कुलगुरु कार्यालय
४. मा. कुलसचिव यांचे कार्यालय
५. देयके विभाग (वित्त व लेखा विभाग)

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2024 ◑ CW 978374

अनु क्र : ८३२५१ दिनांक : १२/३/२४
नांव : प्रविण शांतीकुमार गायकवाड
यांनी रुपये ५००/- चा जनरल स्टँम्प मागितलेवरुन
हा रुपये ५००/- चा स्टँम्प व भरतीस
रुपये चा जनरल स्टँम्प
____________ या करणांकरिता दिला

एस. आर. मेरगु
मुद्रांक विक्रेता, सोलापूर कोड नं : २५११००५
परवाना ता. ०२/१२/१९९८ मो. नं. ९८२२१९६९०८

कोषागार कार्यालय सोलापूर
03 MAR 2025
मुद्रांक प्रमुख लिपीक/उपलेखापाल

## करारपत्र

लिहून घेणार: - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या तर्फे कुलसचिव

यांसी

लिहून देणार: - मे. प्रविण एंटरप्रायझेस, अ-44, अभिषेक नगर, मुरारजी पेठ, सोलापूर.

प्रस्तुत विद्यापीठाच्या पीएम उषा प्रकल्पाच्या सॉफ्ट कॉम्पोनट अंतर्गत व विद्यापीठातील इतर उपक्रमाकरिता दोन वर्षाच्या दरकरारामधून भोज़न व्यवस्था पुरविण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने मा. कुलसचिव लिहून घेणार व मे. प्रविण एंटरप्रायझेस, सोलापूर यांच्या समवेत दिनांक 2 9 MAR 2025 रोजी सोलापूर येथे सदर करारनामा करण्यात येत आहे. सदर करारनामातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

अटी व शर्ती

१. सदर भोजन व्यवस्थेचा दरकरार हा दि. 01 APR 2025 ते 31 MAR 2027 या दोन वर्षाच्या कालावधीसाठीं राहील.

२. आपणास कार्यारंभ / पुरवठा आदेश दिल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

३. दरपत्रकामध्ये ठरल्यानुसार भोजन व नाष्ट्याचे प्रकार ठरलेल्या दराप्रमाणे करार झाल्यापासून दोन वर्षापर्यंत पुरविणे बंधनकाराक राहील.

४. विद्यापीठाने नमूद केलेल्या Quantity मध्ये बदल करण्याचा अधिकार विद्यापीठास आहेत व त्यानुसार पात्र पुरवठाधारकास भोजन व्यवस्था करणे आवश्यक आहे.

५. न्युनतम दर असलेल्या पात्र पुरवठाधारकाचा भोजनाचा दर्जा योग्य नसल्यास त्याचा मक्ता रद्द करुन दुसऱ्या न्युनतम दर असलेल्या पात्र पुरवठाधारकास मक्ता देण्याचा अधिकार विद्यापीठास असेल.

६. आवश्यकतेनुसार इतर पात्र भोजन पुरवठाधारकदेखील पात्र झालेल्या न्युनतम दरामध्ये दर्जेदार व सकस भोजन पुरवठा करण्यास तयार असल्यास त्यास भोजन पुरवठा करण्याचा आदेश देण्याचा अधिकार विद्यापीठाकडें असेल.

७. सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ मधील तपशीलाप्रमाणे आवश्यकतेनुसार पुरवठाधारकाने मागणीनुसार व अंतिम करण्यात आलेल्या दरानुसार भोजन व्यवस्था दोन वर्ष कालावधीसाठी अमर्यादीत (Unlimited) स्वरुपात देणे आवश्यक आहे. सदर दराचे संक्षिप्त रुप खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| | **A** | |
| १. | नाष्टा/न्याहारी (Breakfast) व गरम पेय | ८५.०० |
| २. | स्पेशल नाष्टा व गरम पेय | १३०.०० |
| ३. | VIP/VVIP नाष्टा व गरम पेय | १९०.०० |
| | **B** | |
| १. | High Tea | १६०.०० |
| | **C** | |
| १. | Simple Thali - साधे जेवण (थाळी), बफे स्टॉल | १५०.०० |
| २. | Special Thali विशेष जेवण (थाळी) बफे स्टॉल | २५०.०० |
| ३. | VIP Thali भोजन/जेवण (थाळी) राऊंड टेबल व्यवस्था (Round Table) | ३५०.०० |
| ४. | VVIP Thali भोजन राऊंड टेबल व्यवस्था (Round Table) | ४००.०० |

८. पुरवठाधारकाने सदर निविदेतील सर्व बाबींचे पालन करणे आवश्यक राहील.

९. भोजनाकरीता लागणारे पाणी, जार, ग्लास, पाणी बॉटल, थाळी, प्लेट, वाटी व इतर साहित्य आणि कामगार पुरविण्याची जबाबदारी ही पुरवठाधारकाची असेल.

१०. भोजन व्यवस्था केलेल्या ठिकाणी मंडपाची गरज भासल्यास मंडप टाकण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

११. पुरवठाधारकाने स्वयपाकासाठी किंवा अन्न गरम करण्यासाठी कोणत्याही विजेच्या उपकरणांचा वापर करु नये, पुरवठाधारकाने फक्त व्यावसायिक (कमर्शियल) एल. पी. जी. गॅसचा वापर करावा, स्वंयपाकासाठी लाकडाचा किंवा इंधनाचा वापर करता येणार नाही.

१२. पुवरठाधारकाने शॉप ॲक्ट व किमान वेतनाच्या नियमाचे पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

१३. भोजनाची व्यवस्था करताना एखादा अपघात होऊन कामगाराची हानी झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१४. सदर भोजन व्यवस्थेसंदर्भात प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदेमधील अटी व शर्ती ह्या प्रस्तुत कराराचा भाग राहील व त्याचे पालन करणे लिहून देणार पुरवठादार यांच्यावर बंधकारक राहील.

१५. शासनाने अन्न पदार्थ व भोजन व्यवस्थेसंबंधी व कामगार विषयी विहित केलेल्या तरतुदींचे व मापदंडाचे पालन करणे लिहून देणार पुरवठादार यांच्यावर बंधनकारक राहील, तसेच सदर तरतुदी व मापदंडाचे व कामगार विषयी शासनाने विहित तरतुदींचे भंग झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी लिहून देणार पुरवठादार यांच्यावर राहील व त्यास विद्यापीठास जबाबदार धरले जाणार नाहीत, हे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे.

१६. पुरवठाधारकाने अल्पवयीन मुले/मुली म्हणजे बालकामगार म्हणून कामावर ठेवण्यात येंवू नये.

१७. पुरवठाधारकांकडून देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थ Quality Standard असणे बंधनकारक आहे.

१८. पुरवठाधारकांकडून पुरविण्यात येणारे खाद्य पदार्थ हे निविदेत दिलेल्या तपशीलाप्रमाणेच असणे आवश्यक आहे. त्याकरिता आवश्यक्र असल्यास सदर खाद्य पदार्थांचा दर्जा विद्यापीठाच्या समितीकडून तपासून घेण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

१९. पुरवठाधारकास सर्व खाद्य व पेय पदार्थ उत्कृष्ट, आरोग्य वर्धक व चांगल्या मालापासुन निर्मित करणे अनिवार्य आहे. तसेच भोजन निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणार साहित्य (भांडी) स्वच्छ व मुबलक प्रमाणात असणे आवश्यक आहे. (पुरवठाधारकास शासनाने सूचित केलेले नियमबाह्य प्लॅस्टीक वस्तू वापरता येणार नाहीत.)

२०. भोजनासाठी गोड पदार्थ हे वनस्पती तुपामध्ये (सनफ्लावर ब्रँड) व इतर पदार्थ हे भुईमुगाच्या डबल फिल्टर (धारा/स्वस्तीक ब्रँड) खाद्य तेलामध्ये तयार करावे लागतील. भात तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा तांदुळ हा इंडिया गेट/ कोहीनुर/बासमती तांदुळ वापरणे अनिवार्य आहे. तसेच भोजन तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे इतर सर्व साहित्य हे नामांकित कंपनीचे Ag Mark प्रमाणित सीलबंद व उच्च प्रतिचे वापरणे बंधनकारक आहे.

२१. भोजन व्यवस्थेसाठी लागणारे बुफे टेबल, त्यावरील स्वच्छ कापड, टेबल सजावट, तसेच त्या सोबतच्या खुर्च्या उपलब्ध करुन देणे इत्यादी कामे पुरवठादारास करावी लागतील.

२२. कामगार कायद्याप्रमाणे सर्व नियमाचे पालन करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक आहे.

२३. सदर कामाच्या दरपत्रक/निविदेतील नमूद तरतूदीप्रमाणे मक्तेदाराने विद्यापीठाने ठरविलेली ५% रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रुपये फक्त) इतकी सुरक्षा ठेव प्रस्तुत विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडे जमा करण्याचे आहे.

२४. दरकरार संपल्यानंतर लिहून देणार/पुरवठादाराने मागणी केल्यानंतर विद्यापीठाकडे जमा केलेली सुरक्षा ठेव रक्कम बिनव्याजी पुरवठादारास परत करण्यात येईल.

२५. आपण पुरविलेल्या भोजनाबाबत विद्यापीठाच्या प्रशासनाकडे काही तक्रार आल्यास व त्याचे निरसन न झाल्यास सदर करार रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

२६. मक्तेदाराकडून पुरवठा केले जाणारे अन्न पदार्थ व भोजन हे चांगल्या दर्जाचे व आरोग्यवर्धक असावेत, याची जबाबदारी मक्तेदारावर राहील.

२७. मक्तेदाराच्या सर्व कर्मचाऱ्यांचे वर्तन व वागणूक विद्यार्थी व पालक व विद्यापीठाचे कर्मचारी यांच्या समवेत सभ्यतेचे राहील याची मक्तेदाराने दक्षता घेणे आवश्यक आहे.

२८. भोजन व्यवस्थेतील व भोजन परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मक्तेदाराची असेल. याठिकाणी अस्वच्छता आढळून आल्यास प्रत्येक वेळी रू.५००/- इतका दंड आकारण्यात येईल.

२९. सदरचा करार एक महिन्याच्या पूर्व सुचना देऊन मा. कुलसचिव रद्द करु शकतील. तसेच मक्तेदारानी मान्य केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता करार रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठास राहतील.

३०. मक्तेदारास अंशत: किंवा पूर्णत: भोजन व्यवस्था दुसऱ्या मक्तेदारास चालविण्यास देता येणार नाही.

३१. पुरवठा आदेशानुसार पुरवठाधारकाने पुरवठा केल्यानंतर सदरचे देयके संबंधित विभाग/संकुल यांच्याकडे सादर करावीत.

३२. करारात नमूद केलेल्या वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीचे करार कालावधीत उल्लघंन झाल्याचे आढळल्यास करार तात्काळ रद्द करण्याचे व मक्तेदाराने विद्यापीठाकडे जमा केलेली सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्याचे पूर्ण अधिकार विद्यापीठास आहेत. अशा परिस्थितीत विद्यापीठाचा जो काही निर्यण अंतिम राहील व तो मक्तेदारावर बंधनकारक असेल.

३३. पुरवठा धारकाने ऐनवेळी पुरवठा करण्यास नकार दिल्यास अथवा असमर्थता दर्शविल्यास, अशावेळी सदर कार्यक्रम पूर्ण होण्याच्या दृष्टीने बाजारातून चालू दराने व्यवस्था करण्यात येईल व देयकामधील तफावत संबंधित पुरवठाधारकाच्या सुरक्षा ठेव मधून वसूल करण्यात येईल.

३४. भोजन व्यवस्थेतील शिल्लक राहिलेल्या अन्नाची विल्हेवाट लावण्याची संपुर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील.

३५. सदरील दरकरारा संबंधीत काही वाद निर्माण झाल्यास तो सोलापूर न्यायालयीन कक्षेच्या अधिन राहून करण्यात येईल.

वरील प्रमाणे अटी व शर्ती उभय पक्षी समजण्यात आले असून त्याचे पाल करणे बंधनकारक आहे.

आज दि. 2 9 MAR 2025 रोजी प्रस्तुत अटी व शर्ती मान्य करून करारनामा केला.

साक्षीदार: -

लिहून देणार
मे. प्रविण एंटरप्रायझेस, सोलापूर

1. सही: - MS khwarde
   नाव: - डॉ. महादेव खराडे
   पत्ता: - वित्त विभाग, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

प्रविण शशिकुमार गायकवाड, मुरारजी पेठ सोलापुर

2. सही:
   नाव: - डॉ. प्रभाकर कोळेकर
   पत्ता: - पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

लिहून घेणार
(योगिनी घारे)
कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्योदेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CN 988555

अनु क्र : ५६५ दिनांक : ४ / ४ /२५

नांव : यश भिमा गायकवाड

यांनी रुपये ५००/- चा जनरल स्टॅम्प मागितलेवरुन

हा रुपये ५००/- चा स्टॅम्प व भरतीस

रुपये चा जनरल स्टॅम्प

या करणांकरिता दिला

एस. आर. मेरगु
मुद्रांक विक्रेता, सोलापूर कोड नं : २५११००५
परवाना ता. ०२/१२/१९९८ मो. नं. ९८२२१८६१०८

कोषागार कार्यालय सोलापू
2 8 MAR 2025
मुद्रांक प्रमुख लिपीक/उपलेखापाल

Gaikwad

# करारपत्र

लिहून घेणार: - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या तर्फे कुलसचिव यांसी

लिहून देणार: - मे. प्रगती केटरर्स, आमराई, देशमुख पाटील वस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर.

प्रस्तुत विद्यापीठाच्या पीएम उषा प्रकल्पाच्या सॉफ्ट कॉम्पोनंट अंतर्गत व विद्यापीठातील इतर उपक्रमाकरिता दोन वर्षाच्या दरकरारामधून भोजन व्यवस्था पुरविण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने मा. कुलसचिव लिहून घेणार व मे. प्रगती केटरर्स, सोलापूर यांच्या समवेत दिनांक 2 9 MAR 2025 रोजी सोलापूर येथे सदर करारनामा करण्यात येत आहे. सदर करारनामातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

अटी व शर्ती

१. सदर भोजन व्यवस्थेचा दरकरार हा दि. 1 APR 2025 ते 31 MAR 2027 या दोन वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

२. आपणास कार्यारंभ / पुरवठा आदेश दिल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

३. दरपत्रकामध्ये ठरल्यानुसार भोजन व नाष्ट्याचे प्रकार ठरलेल्या दराप्रमाणे करार झाल्यापासून दोन वर्षापर्यंत पुरविणे बंधनकाराक राहील.

४. विद्यापीठाने नमूद केलेल्या Quantity मध्ये बदल करण्याचा अधिकार विद्यापीठास आहेत व त्यानुसार पात्र पुरवठाधारकास भोजन व्यवस्था करणे आवश्यक आहे.

५. न्युनतम दर असलेल्या पात्र पुरवठाधारकाचा भोजनाचा दर्जा योग्य नसल्यास त्याचा मक्ता रद्द करुन दुसऱ्या न्युनतम दर असलेल्या पात्र पुरवठाधारकास मक्ता देण्याचा अधिकार विद्यापीठास असेल.

६. आवश्यकतेनुसार इतर पात्र भोजन पुरवठाधारकदेखील पात्र झालेल्या न्युनतम दरामध्ये दर्जेदार व सकस भोजन पुरवठा करण्यास तयार असल्यास त्यास भोजन पुरवठा करण्याचा आदेश देण्याचा अधिकार विद्यापीठाकडे असेल.

७. सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ मधील तपशीलाप्रमाणे आवश्यकतेनुसार पुरवठाधारकाने मागणीनुसार व अंतिम करण्यात आलेल्या दरानुसार भोजन व्यवस्था दोन वर्ष कालावधीसाठी अमर्यादीत (Unlimited) स्वरुपात देणे आवश्यक आहे. सदर दराचे संक्षिप्त रुप खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| | A | |
| १. | नाष्टा/न्याहारी (Breakfast) व गरम पेय | ८५.०० |
| २. | स्पेशल नाष्टा व गरम पेय | १३०.०० |
| ३. | VIP/VVIP नाष्टा व गरम पेय | १९०.०० |
| | B | |
| १. | High Tea | १६०.०० |
| | C | |
| १. | Simple Thali - साधे जेवण (थाळी), बफे स्टॉल | १५०.०० |
| २. | Special Thali विशेष जेवण (थाळी) बफे स्टॉल | २५०.०० |
| ३. | VIP Thali भोजन/जेवण (थाळी) राऊंड टेबल व्यवस्था (Round Table) | ३५०.०० |
| ४. | VVIP Thali भोजन राऊंड टेबल व्यवस्था (Round Table) | ४००.०० |

८. पुरवठाधारकाने सदर निविदेतील सर्व बाबींचे पालन करणे आवश्यक राहील.

९. भोजनाकरीता लागणारे पाणी, जार, ग्लास, पाणी बॉटल, थाळी, प्लेट, वाटी व इतर साहित्य आणि कामगार पुरविण्याची जबाबदारी ही पुरवठाधारकाची असेल.

१०. भोजन व्यवस्था केलेल्या ठिकाणी मंडपाची गरज भासल्यास मंडप टाकण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

११. पुरवठाधारकाने स्वयंपाकासाठी किंवा अन्न गरम करण्यासाठी कोणत्याही विजेच्या उपकरणांचा वापर करु नये, पुरवठाधारकाने फक्त व्यावसायिक (कमर्शियल) एल. पी. जी. गॅसचा वापर करावा, स्वयपाकासाठी लाकडांचा किवा इंधनाचा वापर करता येणार नाही.

१२. पुवरठाधारकाने शॉप ॲक्ट व किमान वेतनाच्या नियमाचे पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

१३. भोजनाची व्यवस्था करताना एखादा अपघात होऊन कामगाराची हानी झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१४. सदर भोजन व्यवस्थेसंदर्भात प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदेमधील अटी व शर्ती ह्या प्रस्तुत कराराचा भाग राहील व त्याचे पालन करणे लिहून देणार पुरवठादार यांच्यावर बंधकारक राहील.

१५. शासनाने अन्न पदार्थ व भोजन व्यवस्थेसंबंधी व कामगार विषयी विहित केलेल्या तरतुदींचे व मापदंडाचे पालन करणे लिहून देणार पुरवठादार यांच्यावर बंधनकारक राहील, तसेच सदर तरतुदी व मापदंडाचे व कामगार विषयी शासनाने विहित तरतुदींचे भंग झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी लिहून देणार पुरवठादार यांच्यावर राहील व त्यास विद्यापीठास जबाबदार धरले जाणार नाहीत, हे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे.

१६. पुरवठाधारकाने अल्पवयीन मुले/मुली म्हणजे बालकामगार म्हणून कामावर ठेवण्यात येवू नये.

१७. पुरवठाधारकांकडून देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थ Quality Standard असणे बंधनकारक आहे.

१८. पुरवठाधारकांकडून पुरविण्यात येणारे खाद्य पदार्थ हे निविदेत दिलेल्या तपशीलाप्रमाणेच असणे आवश्यक आहे. त्याकरिता आवश्यक असल्यास सदर खाद्य पदार्थांचा दर्जा विद्यापीठाच्या समितीकडून तपासून घेण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

१९. पुरवठाधारकास सर्व खाद्य व पेय पदार्थ उत्कृष्ट, आरोग्य वर्धक व चांगल्या मालापासुन निर्मित करणे अनिवार्य आहे. तसेच भोजन निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणार साहित्य (भांडी) स्वच्छ व मुबलक प्रमाणात असणे आवश्यक आहे. (पुरवठाधारकास शासनाने सूचित केलेले नियमबाह्य प्लॅस्टीक वस्तू वापरता येणार नाहीत.)

२०. भोजनासाठी गोड पदार्थ हे वनस्पती तुपामध्ये (सनफ्लावर ब्रँड) व इतर पदार्थ हे भुईमुगाच्या डबल फिल्टर (धारा/स्वस्तीक ब्रँड) खाद्य तेलामध्ये तयार करावे लागतील. भात तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा तांदुळ हा इंडिया गेट/ कोहीनुर/बासमती तांदुळ वापरणे अनिवार्य आहे. तसेच भोजन तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे इतर सर्व साहित्य हे नामांकित कंपनीचे Ag Mark प्रमाणित सीलबंद व उच्च प्रतिचे वापरणे बंधनकारक आहे.

२१. भोजन व्यवस्थेसाठी लागणारे बुफे टेबल, त्यावरील स्वच्छ कापड, टेबल सजावट, तसेच त्या सोबतच्या खुर्च्या उपलब्ध करुन देणे इत्यादी कामे पुरवठादारास करावी लागतील.

२२. कामगार कायद्याप्रमाणे सर्व नियमाचे पालन करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक आहे.

२३. सदर कामाच्या दरपत्रक/निविदेतील नमूद तरतूदीप्रमाणे मक्तेदाराने विद्यापीठाने ठरविलेली ५% रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रुपये फक्त) इतकी सुरक्षा ठेव प्रस्तुत विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडे जमा करण्याचे आहे.

२४. दरकरार संपल्यांनतर लिहून देणार/पुरवठादाराने मागणी केल्यानंतर विद्यापीठाकडे जमा केलेली सुरक्षा ठेव रक्कम बिनव्याजी पुरवठादारास परत करण्यात येईल.

२५. आपण पुरविलेल्या भोजनाबाबत विद्यापीठाच्या प्रशासनाकडे काही तक्रार आल्यास व त्याचे निरसन न झाल्यास सदर करार रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

२६. मक्तेदाराकडून पुरवठा केले जाणारे अन्न पदार्थ व भोजन हे चांगल्या दर्जाचे व आरोग्यवर्धक असावेत, याची जबाबदारी मक्तेदारावर राहील.

२७. मक्तेदाराच्या सर्व कर्मचाऱ्यांचे वर्तन व वागणूक विद्यार्थी व पालक व विद्यापीठाचे कर्मचारी यांच्या समवेत सभ्यतेचे राहील याची मक्तेदाराने दक्षता घेणे आवश्यक आहे.

२८. भोजन व्यवस्थेतील व भोजन परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मक्तेदाराची असेल. याठिकाणी अस्वच्छता आढळून आल्यास प्रत्येक वेळी रू.५००/- इतका दंड आकारण्यात येईल.

२९. सदरचा करार एक महिन्याच्या पूर्व सुचना देऊन मा. कुलसचिव रद्द करु शकतील. तसेच मक्तेदारानी मान्य केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता करार रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठास राहतील.

३०. मक्तेदारास अंशत: किंवा पूर्णत: भोजन व्यवस्था दुसऱ्या मक्तेदारास चालविण्यास देता येणार नाही.

३१. पुरवठा आदेशानुसार पुरवठाधारकाने पुरवठा केल्यानंतर सदरचे देयके संबंधित विभाग/संकुल यांच्याकडे सादर करावीत.

३२. करारात नमूद केलेल्या वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीचे करार कालावधीत उल्लघंन झाल्याचे आढळल्यास करार तात्काळ रद्द करण्याचे व मक्तेदाराने विद्यापीठाकडे जमा केलेली सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्याचे पूर्ण अधिकार विद्यापीठास आहेत. अशा परिस्थितीत विद्यापीठाचा जो काही निर्यण अंतिम राहील व तो मक्तेदारावर बंधनकारक असेल.

३३. पुरवठा धारकाने ऐनवेळी पुरवठा करण्यास नकार दिल्यास अथवा असमर्थता दर्शविल्यास, अशावेळी सदर कार्यक्रम पूर्ण होण्याच्या दृष्टीने बाजारातून चालू दराने व्यवस्था करण्यात येईल व देयकामधील तफावत संबंधित पुरवठाधारकाच्या सुरक्षा ठेव मधून वसूल करण्यात येईल.

३४. भोजन व्यवस्थेतील शिल्लक राहिलेल्या अन्नाची विल्हेवाट लावण्याची संपुर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील.

३५. सदरील दरकरारा संबंधीत काही वाद निर्माण झाल्यास तो सोलापूर न्यायालयीन कक्षेच्या अधिन राहून करण्यात येईल.

वरील प्रमाणे अटी व शर्ती उभय पक्षी समजण्यात आले असून त्याचे पाल करणे बंधनकारारक आहे.

आज दि 29 MAR 2025 रोजी प्रस्तुत अटी व शर्ती मान्य करून करारनामा केला.

Gaikwad

लिहून देणार
मे. प्रगती केटरर्स, सोलापूर
पुष्पा भिमा गायकवाड
देशमुख पाटिल वस्ती
सोलापूर.

साक्षीदार: -

1. सही: - msiwarde

नाव: - डॉ. महादेव खराडे

पत्ता: - वित्त विभाग, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

2. सही: -

नाव: - डॉ. प्रभाकर कोळेकर

पत्ता: - पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

लिहून घेणार
(योगिनी घारे)
कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्योदेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# परिशिष्ठ अ

| अ.क्र. | | | A | व्यक्तींची संख्या | Rate |
|---|---|---|---|---|---|
| १. | नाष्टा/न्याहारी (Breakfast) व गरम पेय | १ | उपमा/पुरी-भाजी/पोहे/शाबू खिचडी/डोसा/ मिसळपाव/उत्तपा इत्यादी खाद्यपदार्थ (यापैकी दोन) | १० ते ३०० | ८५.०० |
| | | २ | चहा/कॉफी/ग्रीन टी/लेमन टी/ब्लॅक टी/गुळाचा चहा/दुध इत्यादी (यापैकी दोन) | | |
| | | **(वरील अ.क्र. १ व २ या मधील दोन पदार्थ)** | | | |
| २. | स्पेशल नाष्टा व गरम पेय | १. | इडली-सांबर /वडा-सांबर /शिरा/डोसा इत्यादी खाद्यपदार्थ (यापैकी दोन) | १० ते ३०० | १३०.०० |
| | | २. | पराठा- (आलु पराठा/गोबी पराठा/मेथी पराठा/थालीपीठ/धपाटे)/शाबूवडा इत्यादी खाद्यपदार्थ (यापैकी दोन) | | |
| | | ३. | चहा/कॉफी/ग्रीन टी/लेमन टी/ब्लॅक टी/गुळाचा चहा/दुध इत्यादी (यापैकी दोन) | | |
| | | **(वरील अ.क्र. १, २ व ३ या मधील दोन पदार्थ)** | | | |
| ३. | VIP/VVIP नाष्टा व गरम पेय | १. | ब्रेड-जाम-बटर सॅन्डविच- (ग्रील्ड,साधा), डोसा (विविध प्रकार), पायनापल शिरा, ढोकळा (वरील सर्व खाद्यपदार्थ) | १० ते ३०० | १९०.०० |
| | | २. | विविध कट फ्रुटस- (केळी, डांळीब,सफरचंद, मोसंबी, संत्रा, पेरु, पपई), ड्रायफ्रुट्स- (पिस्ता, काजु, बदाम, अक्रोड, अंजिर) (वरील सर्व खाद्यपदार्थ) | | |
| | | ३. | चहा, कॉफी, ग्रीन टी, लेमन टी, ब्लॅक टी, गुळाचा चहा, दुध (वरील सर्व पदार्थ) | | |
| | | **(वरील अ.क्र. १, २ व ३ मधील सर्व पदार्थ)** | | | |
| | | | B | | |
| १. | High Tea | १. | Regular चहा,कॉफी,ग्रीन टी,लेमन टी,ब्लॅक टी,गुळाचा चहा,दुध (वरीलपैकी तीन पदार्थ) | १० ते ३०० | १६०.०० |
| | | २. | चिप्स,बटाटा चिवडा,शेंगा लाडू,डिंक लाडू,ग्रील्ड सॅन्डविच, समोसा, वडा-पाव, डोकळा, साबुदाना, व्हेज कटलेट (वरीलपैकी तीन पदार्थ) | | |
| | | | बर्फी, सोनपापडी, मैसुरपाक, गुलाबजामून, इत्यादी (वरील पैकी तीन पदार्थ) | | |
| | | ३. | विविध फळे- (केळी, सफरचंद, मोसंबी, संत्रा, पेरु, पपई) (वरील पैकी तीन फळे) | | |
| | | **(वरील अ.क्र. १, २ व ३ या मधील तीन पदार्थ)** | | | |
| | | | C | | |
| १. | Simple Thali साधे जेवण (थाळी) बफे स्टॉल | १. | चपाती/भाकरी (नरम/कडक) | १० ते ३०० | १५०.०० |
| | | २. | सुकी भाजी (आलु मटर/मिक्स भाजी) | | |
| | | ३. | पातळ भाजी (दाल तडका/दाल फ्राय) | | |
| | | ४. | भात- (जिरा राईस) | | |
| | | ५. | गोड पदार्थ (गुलाब जामुन/जिलेबी) | | |
| | | ६. | लोणचे, शेंगाचटणी,रोस्टेड पापड, पाणी (जार/पाणी बॉटल) (वरील सर्व पदार्थ) | | |
| | | **(वरील अ.क्र. १ ते ५ मधील प्रत्येकी एक पदार्थ)** | | | |
| २. | Special Thali विशेष जेवण (थाळी) बफे स्टॉल | १. | चपाती/भाकरी(नरम/कडक)/मसालापुरी/थालीपीट (यापैकी दोन पदार्थ) | १० ते ३०० | २५०.०० |
| | | २. | सुकी भाजी (व्हेज भुना/भेंडी फ्राय/आलु मटर) (यापैकी दोन पदार्थ) | | |
| | | ३. | पातळ भाजी (गरगटा/दाल तडका/दाल फ्राय) (यापैकी एक पदार्थ) | | |
| | | ४. | भात- (जिरा राईस/व्हेज पुलाव) (यापैकी एक पदार्थ) | | |
| | | ५. | स्वीट (जिलेबी/गुलाब जामून व इतर) (यापैकी एक पदार्थ) | | |
| | | ६. | कोशिंबीर/ लोणचे /शेंगाचटणी/रोस्टेड पापड पाणी- (जार, पाणी बॉटल) (वरील सर्व पदार्थ) | | |
| | | **(वरील अ.क्र. १ व २- दोन पदार्थ आणि ३ ते ५ मधील एक पदार्थ)** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | VIP Thali भोजन/जेवण (थाळी) राऊंड टेबल व्यवस्था (Round Table) | १. | वेलकम ड्रिंक (मॉकटेल, पायनापल ज्युस, सुप) (यापैकी दोन पेय पदार्थ) | १० ते ३०० | ३५०.०० |
| | | २. | चपाती, भाकरी(नरम/कडक), मसाला पुरी, थालीपीट,पराठा (यापैकी तीन पदार्थ) | | |
| | | ३. | दोन महाराष्ट्रीयन,पंजाबी,राजस्थानी,गुजराथी डीश (यापैकी दाने डीश) | | |
| | | ४. | दाल तडका, दाल फ्राय, गरगटा (यापैकी दोन पदार्थ) | | |
| | | ५. | भात- (जिरा राईस/व्हेज पुलाव) (यापैकी एक पदार्थ) | | |
| | | ६. | सॅलड, कोशिंबीर, मसाला रोस्टेड पापड, कडक भजी, पकोडा (सर्व पदार्थ) | | |
| | | ७. | स्वीट (गुलाब जामून, रबडी,बासुंदी) (यापैकी दोन पदार्थ) | | |
| | | ८. | पाणी बॉटल २०० ते ५०० मिली | | |
| | | **(वरील अ. क्र. १, ३, ४ व ७- दोन पदार्थ, अ.क्र. २ तीन पदार्थ आणि अ.क्र.६ सर्व पदार्थ)** | | | |
| ४. | VVIP Thali भोजन राऊंड टेबल व्यवस्था (Round Table) | १. | वेलकम ड्रिंक (मॉकटेल,पायनापल ज्युस),सुप (सर्व पदार्थ) | १० ते ३०० | ४००.०० |
| | | २. | चपाती/भाकरी(नरम/कडक),मसाला पुरी,थालीपीट,खवापोळी (सर्व पदार्थ) | | |
| | | ३. | दोन महाराष्ट्रीयन,पंजाबी,राजस्थानी,गुजराथी डीश (पैकी तीन डीश) | | |
| | | ४. | दाल तडका, दाल फ्राय,दाल मखणी (यापैकी दोन पदार्थ) | | |
| | | ५. | भात- (जिरा राईस,व्हेज पुलाव,व्हेज बिर्याणी) (सर्व पदार्थ) | | |
| | | ६. | सॅलड, कोशिंबीर,मसाला रोस्टेड पापड, कडक भजी, पकोडा (सर्व पदार्थ) | | |
| | | ७. | दोन प्रकारचे स्वीट (गुलाब जामून,रबडी,बासुंदी,जिलेबी, आईस्क्रिम) (यापैकी दोन पदार्थ) | | |
| | | ८. | पाणी बॉटल २०० ते ५०० मिली | | |
| | | **(वरील अ.क्र. १, २, ५ व ६ सर्व पदार्थ, अ.क्र. ३ एक पदार्थ आणि अ.क्र. ४ व ७ दोन पदार्थ)** | | | |